SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416004 MAHARASHTRA
Phone - CoE Office : 0231-2609068 Other Exam.Section: 0231-2609119
Website: www.unishivaji.ac.in E-mail: coe@unishivaj.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र
फोन : परीक्षा व मुल्यमापन मंडळ कार्यालय :0231-2609068 इतर परीक्षा –1 0231-2609119
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ई मेल coe@unishivaj.ac.in
Estd : 1962
NAAC 'A' Grade

Ref. No. / SU/Exam/OE-1/On Exam/270 Date :- 11 JAN 2018

1) अधिविभागप्रमुख / समन्वयक / संचालक,
सर्व अधिविभाग / दूरशिक्षण केंद्र

2) प्राचार्य,
सर्व सलंग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## विषय : परीक्षा अर्ज भरण्याबाबत.

महोदय / महोदया,

विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल विहीत वेळेत व अचूक लागण्याच्या दृष्टीने आपले व आपल्या सहकार्यांचे बहुमोल सहकार्य लाभत आहे. निकालाचे काम हे मूळ परीक्षा अर्ज भरण्यापासून होत असते. याअनुषंगाने परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भात खालील बाबी प्रामुख्याने निदर्शनास आलेल्या आहेत. (समरीमध्ये "No Candidate" आले असतानाही परीक्षा केंद्रावर विद्यार्थी हजर झाले त्यामुळे परीक्षा केंद्रावर वेळेत प्रश्नपत्रिका न पोहचणे, अशा बाबींना सामोरे जावे लागले आहे.)

1) विद्यार्थ्यांनी विहीत वेळेत परीक्षा शुल्क भरले असून, महाविद्यालयाने / अधिविभागाने ते विद्यापीठाकडे जमा केले नाही.

2) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा अर्ज भरले आहे तथापि, महाविद्यालयाने / अधिविभागाने संगणक प्रणालीमध्ये कायम केले नाही.

3) ऑनलाईन अर्ज काही तांत्रिक कारणास्तव जनरेट झाले नाहीत तर सदर अर्ज विद्यार्थ्यांकडून हस्तलिखित भरून घेतले जातात असे परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे न पाठवताच महाविद्यालयाने / अधिविभागाने स्वतःकडे ठेवून घेतले आहेत.

4) हस्तलिखित परीक्षा अर्ज विद्यापीठात येऊन संगणकीय प्रणालीमध्ये नोंदविलेले नाहीत.

5) विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज व्यवस्थित भरलेले नाहीत. उदा. ज्या त्या सत्राचे परीक्षा अर्ज भरले नाहीत. तसेच विषय, विषयकोड, महाविद्यालयामध्ये / विद्यापीठामध्ये न शिकवला जाणारा विषय निवडल जाणे, उत्तराची भाषा इ. व्यवस्थित भरले नाहीत.

P.T.O

त्यामुळे ब–याच महाविद्यालयातील/अधिविभागातील विद्यार्थ्यांना 'सुधारित बैठक क्रमांक' (Additional Seat Number) द्यावे लागले आहेत, व याचा परिणाम म्हणून निकालामध्ये विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही व निकालामध्ये अचूकता येणार नाही.

सबब, या बाबी विचारात घेता मार्च/एप्रिल 2018 च्या परीक्षेमध्ये पुनरावृत्ती होऊ नये यासाठी खालीलप्रमाणे सर्व सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे कृपया करावी.

1) विद्यापीठाच्या परीक्षक नियुक्ती विभागाच्या परीक्षा अर्ज भरण्याच्या जाहीर केलेल्या विहीत मुदतीतच ऑनलाईन पद्धतीने अर्ज विद्यार्थ्यांकडून भरून घ्यावा. **विहीत मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदत वाढवून दिली जाणार नाही** अथवा यासंदर्भातील पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही. त्यामुळे महाविद्यालयाने/अधिविभागाने पुर्नपरिक्षार्थी (रिपीटर) विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भात अवगत करावे. महाविद्यालयाने/अधिविभागाने **कोणत्याही विद्यार्थ्यांना/पालकांना यासंदर्भात परीक्षा विभागामध्ये पाठवू नये.**

2) जर परीक्षा अर्ज विहीत वेळेत भरले नाहीत तर त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/अधिविभागाची/दूरशिक्षण केंद्राची राहील.

3) महाविद्यालयाने/अधिविभागाने/दूरशिक्षण केंद्राने सदर फॉर्म विहीत मुदतीमध्ये संगणकीय प्रणालीमध्ये कायम करण्याची व विद्यापीठाच्या खात्यावर पैसे भरून पावती ज्या त्या परीक्षा विभागाकडे जमा करण्याची कार्यवाही करावी.

4) विद्यार्थ्यांकडून परीक्षक नियुक्ती विभागाच्या परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भातील परिपत्रकामध्ये नमूद असलेल्या फीची आकारणी करावी. विद्यार्थ्यांकडून जादाची फी आकारू नये.

5) विद्यापीठाकडे परीक्षा शुल्क जमा करताना सोबतप्रमाणे सत्रनिहाय (एकत्रित) तपशीलवार तक्ता द्यावा जेणेकरून विद्यार्थ्यांनी भरलेले शुल्क बरोबर असल्याची खात्री करता येईल. ऑनलाईन पद्धतीने व हस्तलिखित अर्ज यांची यादी स्वतंत्रपणे करावी.

6) हस्तलिखित परीक्षा अर्ज असल्यास ते विद्यापीठात येऊन संगणकीय प्रणालीमध्ये कायम करावेत व सदर अर्ज संबंधित विभागाकडे सादर करावेत.

7) विद्यार्थ्यांनी फॉर्म भरतेवेळी विषय, विषयकोड बरोबर निवडण्याबाबत करण्याबाबत अवगत करावे व सदर परीक्षा अर्ज कायम करताना विद्यार्थ्याने भरलेले विषय, विषयकोड, महाविद्यालयात/अधिविभागात शिकवले जाणारे विषय, विद्यार्थ्याने भरलेली फी इ. योग्य असल्याची खात्री करावी.

8) नामसूची जाहीर झाल्यानंतर परीक्षा फॉर्म भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची तसेच त्यांचे नाव, सत्र, विषय, विषयकोड बरोबर असल्याची खात्री करावी. तसेच प्रवेश पत्र विषय, विषयकोड, सेंटर इ. व्यवस्थित असल्याबाबत **विद्यार्थ्यांना तपासण्यासंदर्भात अवगत करावे. हॉल तिकीटवर विषय, विषयकोड इ. चुकीचे आल्यास तात्काळ विद्यापीठाकडे पाठवून दुरूस्त करून घेणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी.**

PTO.

9) **विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शुल्क न भरल्याच्या कारण्यास्तव परीक्षा अर्ज भरून न घेतल्याबाबत विद्यापीठाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या कारणास्तव विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज नाकारू नयेत. तसेच परीक्षेपासून विद्यार्थ्यांना वंचित ठेवू नये**

10) तात्पुरता प्रवेश संदर्भातील विद्यार्थ्यांचे हजेरी, सत्रकर्म, प्रात्यक्षिक इ. नियमित विद्यार्थ्यांबरोबर करून घ्यावे.

11) ज्या विद्यार्थ्यांचे निकाल काही तांत्रिक कारणास्तव / फेरतपासणीमुळे जाहीर झाले नसतील अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज निकाल जाहीर झालेल्या तारखेपासून **सात दिवसात भरून घ्यावेत.**

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे

**For IT Cell - Arrange/Sort the Student's name ascending first by college, then by Part & then by Branch and give Part wise list of each college**

Name of College -

| Part | Branch | Name of Student | PRN | Theory Exam Fee | | | | Practical Fee | Other Fees, if applicable | | | Total Fee | Subject Code of, Selected Elective Sub. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Sem | Sem | Sem | Sem | | Mark List | Late | Supper Late | | Elective 1 | Elective 2 |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

Seal & Signature of Principal

Pl. Mentioned the Semester wise exam fee applicable to the Student/Part

| SE or FE/SE Theory Fee | | | |
|---|---|---|---|
| Sem 1 | Sem 2 | Sem 3 | Sem 4 |
| **TE or SE/TE Theory Fee** | | | |
| Sem 3 | Sem 4 | Sem 5 | Sem 6 |
| **BE orTE/BE Theory Fee** | | | |
| Sem 5 | Sem 6 | Sem 7 | Sem 8 |